


दिले बेकरार का अफसाना खत्म हुआ!



उमादेवी या नावाने गायिका म्हणून आणि टुनटुन या टोपणनावाने कॉमेडियन म्हणून इंडस्ट्रीत मान्यता पावलेल्या या स्त्रीने आयुष्यात अनेक चढ-उतार अनुभवले. उत्तर प्रदेशात जन्मलेल्या उमादेवी खत्रींच्या डोक्यावरचं माता-पित्याचं छत्र लहानपणीच हरपलं. पुरोगामी विचारांच्या काकांनी त्यांना सांभाळलं. १३व्या वर्षी एक ध्येय उराशी बाळगून त्यांनी तडक मुंबई गाठली. नौशादजींच्या संगीतात गाण्याचं त्यांचं स्वप्न होतं. नौशादजींनी या लहान मुलीला ऐकलं आणि *दर्द*मध्ये 'अफसाना लिख रही हूं...' गाण्याची संधी दिली. त्यानंतर नौशादजींच्या चित्रपटातलं एखादं तरी गीत उमादेवी गायच्याच. दरम्यान मंगेशकर भगिनी उदयाला येऊ लागल्या होत्या. तर इथे उमादेवींचा स्थूलपणा वाढत होता. मग नौशादजींनीच आपल्या निर्मितीतल्या *बाबुल*मध्ये हास्य अभिनेत्री म्हणून संधी देऊन त्यांची दुसरी इनिंग सुरू केली. *आरपार, प्यासा, मिस्टर ॲण्ड मिसेस ५५; मोम की गुडिया*सह अनेक चित्रपटांत अविस्मरणीय भूमिका साकारणाऱ्या टुनटुन हळूहळू या क्षेत्रातून निवृत्त झाल्या. गेली दोन वर्ष हृदयविकाराच्या आजाराने त्या ग्रस्त होत्या. या दोन वर्षांत त्या एखाद्या साध्वीसारखं जीवन जगल्या.

नुकतंच, २४ नोव्हेंबर रोजी वयाच्या ७७व्या वर्षी त्यांची जीवनयात्रा संपली. ✯